**<u>नवी मुंबई महानगरपालिका</u>**

महापालिका सचिव कार्यालय,
नवीन मुख्यालय, 3 रा मजला,
बेलापूर, नवी मुंबई - 400 614.
दिनांक 20 ऑगस्ट 2015.

**<u>निवेदन पत्रिका</u>**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या सर्व सदस्यांना याद्वारे असे कळविण्यांत येते की, मा. महापौरांनी निश्चित केल्यानुसार, **<u>महानगरपालिकेची सप्टेंबर 2015 ची सर्वसाधारण सभा शुक्रवार, दिनांक 04 सप्टेंबर 2015 रोजी सकाळी 11.00 वाजता बेलापूर, भूखंड क्रमांक 01, सेक्टर 15ए, नवी मुंबई महानगरपालिका, नवीन मुख्यालय येथील 5 व्या मजल्यावरील राजमाता जिजाऊ सभागृह</u>** येथे भरेल.

2. महापालिका सदस्यांना अशी विनंती करण्यांत येते की, सप्टेंबर 2015 महिन्याच्या सर्वसाधारण सभेत, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 44 अन्वये, आयुक्तांना काही प्रश्न विचारावयाचे असल्यास असे प्रश्न **(जास्तीत जास्त 5 (पाच) )** आणि ठराव मांडावयाचे असल्यास ठरावाच्या सूचना **(जास्तीत जास्त 3 (तीन) ) <u>महापालिका सचिव</u>** यांचेकडे खालील तारखांच्या आत सचिव कार्यालयाच्या आवक विभागात पोहोचतील अशा रितीने पाठविण्यांत यावेत :-

| | |
|---|---|
| 1. ठरावाच्या सूचना.<br>2. महाराष्ट्र म.अधि.कलम 44 अन्वये विचारावयाचे प्रश्न. | } बुधवार, दि. 26 ऑगस्ट 2015 पर्यंत. |

**मा. महापौरांच्या आदेशावरुन,**

**(चित्रा बाविस्कर)**
**महापालिका सचिव,**
**नवी मुंबई महानगरपालिका.**